**“ऑक्टोबर २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व त्यांच्या अधिनस्त कार्यालयाचे ‘विभाग प्रमुख’ आणि विभागांच्या प्रादेशिक कार्यालयांचे ‘कार्यालय प्रमुख’ तसेच त्यांच्या अधिकारितेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची यादी प्रकाशित व अधिसूचित करण्यात आली आहे.
- दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ पदे व आकृतीबंधात नसलेली ४६ पदे अशा एकूण १०५ अस्थायी पदांना दिनांक १ ऑक्टोबर २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ११ ऑक्टोबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय रकमांच्या अफरातफरी प्रकरणात सुरु असलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी उपसचिव दर्जाचा अधिकारी निर्देशित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ च्या शासन आदेशान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-दोन अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विभाग प्रमुखांच्या वित्तीय अधिकारांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ च्या शासन आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ६ ऑगस्ट २०१८ च्या न्यायनिर्णयास अनुसरुन मंत्रालयीन कक्ष अधिकारी, अवर सचिव, उपसचिव व सहसचिव संवर्गाच्या दिनांक १ जानेवारी १९८६ पासूनच्या ज्येष्ठतासूच्या पुनर्विलोकित करण्यासाठी अवर सचिव / साप्रवि-१४ यांच्या पर्यवेक्षीय नियंत्राणाखाली पाच अधिकारी / कर्मचाऱ्यांचा एक गट स्थापन करण्यात आला आहे.
- दिनांक २२ ऑक्टोबर २०१८ च्या पत्रान्वये हृदयविकारी व्यक्तीस जीवसंजीवनी (Compression only Life Support) बाबत दिनांक २३ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात भूलतज्ञ संघटनेमार्फत मंत्रालयातील अधिकारी / कर्मचारी यांना जनजागृती व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.
- दिनांक २३ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे / ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना सन २०१८-१९ करिता ५५००० प्रशिक्षणार्थींच्या अंतिम प्रशिक्षण आराखडयाच्या रु.१२३४.८० लाख इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ या नऊ महिन्याच्या कालावधीत होणाऱ्या प्रशिक्षण खर्चासाठी एकूण रु.८२७.६५ लाख इतका निधी २०७००८५३ या लेखाशीर्षाखालील ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या उद्दिष्टांतर्गत मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीतील शिफारस केलेल्या ४० उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व आयोगाच्या कार्यालयात नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिनांक १ जुलै २०१८ पासून २% वाढीव दराने महागाई भत्ता मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १ जुलै २०१८ पासून ९% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना दिनांक १ जुलै २०१८ पासून २% वाढीव दराने महागाई भत्ता मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १ जुलै २०१८ पासून ९% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील ७ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहसचिव-१, उपसचिव-२, अवर सचिव-२, कक्ष अधिकारी-५ अशा १० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- ५ कक्ष अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.
- एका अवर सचिवाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- एका सहायक कक्ष अधिकारी-१, लिपिक टंकलेखक-२ अशा ३ कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- सहसचिव-१ व कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- कक्ष अधिकारी-४, सहायक कक्ष अधिकारी-१, उच्चश्रेणी लघुलेकखक-१ अशा ६ अधिकारी / कर्मऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ च्या शासन पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत सन २०१८-१९ मधील मंत्रालयीन लिपिक टंकलेलखक संवर्गाकरिता विविध विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत दिनांक १० ते २१ डिसेंबर २०१८ या कालावधीत पायाभूत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १५ ऑक्टोबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ व १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीतील अंतिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- २ कक्ष अधिकाऱ्यांच्या नांवाचा समावेश ज्येष्ठतासूचीत करण्यात आला आहे.

* * * * * *